आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

## Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

January-2020, Issue-61, Vol-01

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

**Co-Editor**
**Dr. Ravindranath Kewat**
(M.A. Ph.D.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

M.G. Arts, Science ... Commerce College ★Armori★

13) खेडा सत्याग्रह आणि सरदार पटेल
**प्रा. गजानन बोरकर, जि. गडचिरोली** ||70

14) ग्रामीण विकासाच्या भूमिकेचे अध्ययन
**डॉ. नीता धर्माधिकारी, Nagpur** ||74

15) शाश्वत विकासात पाण्याचे महत्त्व
**डॉ. कल्पना भजनी & डॉ. कांचनमाला क्षीरसागर, नागपूर** ||79

16) आरोग्य सेवेचा कणा असणा-या परिचारिकांची भूमिका
**जयश्री दिगंबरराव पवार, जालना** ||83

17) भारतातील शेतीची पिक रचना
**प्रा. डॉ. संजय मगर, जि. औरंगाबाद** ||87

18) परभणी जिल्ह्यातील लिंग गुणोत्तर आणि बाललिंग गुणोत्तराचा भौगोलिक अभ्यास
**प्रा. डॉ. दयानंद उजळंबे, जि. परभणी** ||90

19) लोकसाहित्यातील सामाजिक आणि भाषिक संकेत
**प्रा. केशव धोंडिबा टिपरसे, जि. सांगली** ||95

20) 'अरे भूमिपुत्रा' स्वकथनाची मीमांसा
**प्रा. गणेश दिगंबर सावजी, जि. बुलडाणा** ||99

21) विकास प्रक्रीयेतील स्त्रीयांचे प्रश्न
**डॉ. अरुणा सावरगावकर, उस्मानाबाद** ||102

22) वंचित जमातीचा सांस्कृतीक इतिहास
**प्रा. डॉ. घोलप कमलाकर गोरख, जि. उस्मानाबाद** ||107

23) अकबर कालीन बावली (पिहानी, हरदोई) : एक ऐतिहासिक एवं पुरातात्त्विक सर्वेक्षण
**डॉ० श्याम प्रकाश, छपरा** ||112

24) शिक्षक के सर्वांगिण विकास मे डिजिटल शिक्षा की भूमिका
**डॉ. रश्मि वर्मा, नीमच** ||115

25) 'काली आँधी' और 'महाभोज' : एक तुलनात्मक अध्ययन
**डॉ. अनिता प्रजापत, श्रीगंगानगर (राज.)** ||117



www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

M.G. Art's, Science & Late N.P. Commerce College ★Armori★
Principal
Mahatma Gandhi Arts, Science & Late N. P. Commerce College, Armori, Dist - Gadchiroli

13

# खेडा सत्याग्रह आणि सरदार पटेल

**प्रा. गजानन बोरकर**
महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं वाणिज्य
महाविद्यालय आरमोरी, जि. गडचिरोली

**प्रस्तावना :—**

१९८५ ला भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना झाली. तेव्हा भारतीय जनतेला ब्रिटीश शासनाकडून आपल्या अधिकार रूपी मागण्या पूर्ण करून घेण्याकरिता एक मंच मिळाला. सुरूवातीच्या काळात कॉंग्रेस पक्षावर मवाळ नेत्यांचे वर्चस्व होते. तेव्हा ते आपल्या मागण्या अर्ज व विनंतीच्या माध्यमातून प्रयत्न करायचे. कारण मवाळ नेतृत्वाला ब्रिटीशांसोबत आमने—सामने बंड व लढाई नको होती. परंतु १९०५ नंतर कॉंग्रेसचे नेतृत्व जहाल विचारसरणीकडे आले, तेव्हा त्यांनी ब्रिटीशांसोबत आमने—सामने लढाई करून आपले हक्क मागण्याचे काम केले. यामध्ये लाल, बाल, पाल ही नेतृत्वाची अग्रगण्य आहेत.

गांधीजी १९१५ ला आफ्रिकेहून भारतात परत आले. त्यांच्या आफ्रिकेतील कार्याचा परिचय हळूहळू भारतभर झालेला होता. आपले विचार जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी गांधीजींनी प्रथम आश्रमाची स्थापना केली. त्यांनी देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या लढाईत जनतेला सामील करून घेतांना सक्षम असे नेतृत्व घडविले. त्या नेतृत्वातीलच एक शिलेदार म्हणून सरदार वल्लभभाई पटेल यांचे नाव अत्यंत महत्वाचे ठरते. सरदार वल्लभभाई पटेल हे शेतकऱ्याचा पुत्र असल्याने १९१७ मध्ये गुजरातमधील खेडा जिल्ह्यात शेतकऱ्यांची समस्या सोडविण्याकरिता गांधीच्या मार्गदर्शनाखाली खेडा सत्याग्रहात सहभाग घेतला व इथुनच त्यांच्या नेतृत्वाला आकार मिळाला. एवढेच नव्हे तर या सत्याग्रहातूनच सरदार पटेलांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सहभागीत्व लाभले व पुढे संपुर्ण आयुष्य देशासाठी अर्पण केलेत.

**शेतकऱ्यांची अवस्था :—**

सन १९१७ ला गुजरात येथील खेडा जिल्ह्या मध्ये अतिवृष्टी व पुराने शेतकऱ्यांच्या पिकांचे अपरिमित नुकसान होऊन पिके नष्ट झाली. एवढेच नव्हे तर गुराढोरांना चारा सुद्धा उरला नाही. अशात शेतकरी या उमेदीवर होते की, रब्बी पीक तरी चांगले येईल. परंतु ते पीक सुद्धा अनेक रोगराईमुळे बेकार झाले. अशा दुहेरी मारामुळे शेतकऱ्यांची अवस्था अतिशय बिकट झाली. त्यामुळे त्यांच्या पुढे सरकारी कर चुकविण्याचा यक्ष प्रश्न निर्माण झाला. तत्कालीन काळात कर चुकविण्यासंबंधी नियम होता की, ''हर वर्ष फसल का अनुमान लगाया जाये। यदी फसल छ आने से कम मालुम पडती है, तो आधा लगान स्थगीत कर दिया जाये। और यदी चार आणे से कम दिखती है, तो सारा लगान स्थगीत कर दिया जाये। साथ ही अगर उसमें अगले वर्ष की फसल ना हो, तो पिछले साल का स्थगीत लगान माफ कर दिया जाये।''[१] अशा परिस्थितीत सुद्धा सरकारी अधिकारी जबरदस्तीने शेतकऱ्यांकडून कर वसूल करण्यासाठी शेतकऱ्यांची पिळवणूक करू लागले. कारण शासकीय कर्मचाऱ्यांनी ब्रिटीशांच्या दबावापुढे चुकीच्या पद्धतीने आनेवारी काढून कलेक्टरकडे अहवाल दिलेला होता. परिणामी शेतकऱ्यांना धमकावणे तसेच घरातील साहित्य लिलाव करून कर वसूल करण्याच्या भाषेपर्यंत ब्रिटीश कर्मचाऱ्यांची मजल गेली होती. अशा पंगुत्व अवस्थेत शेतकऱ्यांनी आपला प्रश्न गांधीजींकडे नेला. कारण एप्रिल १९१७ मध्ये त्यांनी बिहारमधील चंपारण्य सत्याग्रहापासून शेतकऱ्यांचा लढा सुरू केला होता. म्हणून शेतकऱ्यांना आशा होती की, गांधीजी आपला प्रश्न सोडविण्यासाठी नक्कीच काहीतरी उपाय करतील.

**गुजरात परिषदेची भुमिका :—**

१९१७ मध्ये गुजरात परिषदेची स्थापना करण्यात आली. त्याच वर्षी नोव्हेंबर १९१७ ला गोद्रा येथे गांधीजींच्या अध्यक्षतेखाली पहिली गुजरात राजकीय परिषद भरविण्यात आली. त्याच ठिकाणी सरदार वल्लभभाई पटेलांची सचिव म्हणून निवड करण्यात आली. या परिषदेत त्यांनी अनेक राजकीय व सामाजिक



Principal
Mahatma Gandhi Arts, Science & Late N. P. Commerce College, Armori, Dist - Gadchiroli
M.G. Arts, Science & late N.P. Commerce College, Armori